मुंबई, बुधवार, २१ मे २०२५ महामुंबई पुढारी MY

1 Page

# शौचालयांची कमतरता, महिलांची कुचंबणाच!

## प्रजा फाऊंडेशनच्या अहवालातून धक्कादायक माहिती समोर, स्थिती दयनीय

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई शहरात सार्वजनिक शौचालयांची स्थिती दयनीय असून यात महिलांसाठी अपुरी व्यवस्था असल्याने त्यांची कुचंबना सुरूच असल्याचे वास्तव प्रजा फाऊंडेशनने मंगळवारी जारी केलेल्या अहवालात मांडले आहे. यात त्यांनी २०२३ सालच्या आकडेवारीनुसार महानगरांतील एकूण सार्वजनिक शौचालयांपैकी ६८०० म्हणजे ६९ टक्के सार्वजनिक शौचालयांमध्ये पाणी व ६० टक्के शौचालयांत वीज जोडणीच झालेली नसल्याचेही म्हटले आहे.

मुंबईतील लोकसंख्येच्या तुलनेत सार्वजनिक शौचालये कमी आहेत. स्वच्छ भारत अभियानानुसार एका शौचालयाचा वापर करणाऱ्या पुरुषांची संख्या ३५ आणि स्त्रियांची संख्या २५ असायला हवी. मात्र, मुंबईत ८६ पुरुष आणि आणि ८१ महिला एका सार्वजनिक शौचालयाचा वापर करीत आहेत. २०२३ च्या आकडेवारीनुसार दर ४ सार्वजनिक शौचालयातील केवळ एक शौचालय स्त्रियांसाठी आहे. शौचालयांचा तुटवडा असून पाणी जोडणी व वीज जोडणी नसलेल्या शौचालयांची संख्याही निम्माहून अधिक आहे. ज्या प्रभागामध्ये व्यापारी व सांस्कृतिक कारणांमुळे ये- जा करणाऱ्या रहिवाशांचे प्रमाण अधिक आहे तेथील स्थिती तर अधिक बिकट असल्याचे अहवालत म्हटले आहे.

**६९%** शौचालयांत पाणी नाही | **६०%** शौचालयांत वीज नाही



### घनकचरा व प्रदूषणाबाबत तक्रारी अधिक

- मुंबईतील स्वच्छता व आणि वायू प्रदूषण समस्यांचा उहापोह अहवालत केला आहे. २०२४ मध्ये मुंबईकरांनी १.१५ लाखाहून अधिक तक्रारी नोंदवल्या आहेत. तक्रारसंख्येत २०१५ च्या तुलनेत ७० टक्के वाढ झाली आहे. मागील १० वर्षातील तक्रारींत घनकचरा तक्रारीं ३८० टक्केने तर प्रदूषणा संदर्भातील तक्रारी ३३४ टक्केनी वाढल्या आहेत.

> नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निवारण होईल याची खबरदारी घ्यावी आणि नागरिकांचे अभिप्राय घेऊन पारदर्शकता वाढवावी. मुंबई महापालिकेच्या पर्यावरण अहवालातील आकडेवारी आणि माहिती अधिकारातील प्राप्त आकडेवारी यामध्ये विसंगती आहे.
>
> -मिलिंद म्हस्के, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रजा फाऊंडेशन